दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● सोमवार दि.१३ एप्रिल २०२६ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २२४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 13 April 2026 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 224 ● Pages 4 ● Rate 4 Rs


### 'जस्टिस फॉर दादा' आंदोलनाची हाक

**मुंबई**–राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताला अडीच महिने उलटूनही तपासाचे सत्य अद्याप समोर आले नसल्याचा खळबळजनक आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी केला आहे. अजितदादांना न्याय मिळवून देण्यासाठी मी एकटाच पायऱ्यांवर बसलो, पण दुर्दैवाने इतर आमदारांची हवी तशी साथ मिळाली नाही, अशी खंत व्यक्त करत अमोल मिटकरींनी आता 'जस्टिस फॉर दादा' या मोहिमेद्वारे रणशिंग फुंकले आहे.आमदार मिटकरी यांनी एका 'लाईव्ह' संवादातून आपल्या मनातील सल बोलून दाखवली. ते म्हणाले, अधिवेशनाच्या काळात शंभुराज देसाई यांच्या साताऱ्याच्या प्रकरणावरून शिवसेना आणि राष्ट्रवादीचे ४० आमदार एकत्र आले. मात्र, मी जेव्हा अजितदादांच्या अपघाताच्या तपासासाठी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलनाला बसलो, तेव्हा विनंती करूनही कुणीही आले नाही. जर त्यावेळी सर्व आमदार एकवटले असते, तर आज तपासाचे चित्र वेगळे असते. दुर्दैवाने आम्ही ती वेळ गमावली.

# जेष्ठ गायिका आशा भोसले यांचे निधन

भारतातील सर्वात ख्यातनाम आणि अष्टपैलू आवाजांपैकी एक असलेल्या आशा भोसले जी यांच्या



निधनाने अतिशय दु:ख झाले. त्यांच्या अनेक दशकांच्या अद्वितीय संगीत प्रवासाने आपल्या सांस्कृतिक वारशाला समृद्ध केले आणि जगभरातील असंख्य लोकांच्या मनाला स्पर्श केला. भावपूर्ण गीतांपासून ते जोशपूर्ण संगीत रचनांपर्यंत, त्यांच्या आवाजात कालातीत तेज होते. त्यांच्याशी झालेल्या संवादांच्या आठवणी मी सदैव जपून ठेवेन.त्यांच्या कुटुंबीयांना, चाहत्यांना आणि संगीतप्रेमींना माझ्या भावपूर्ण संवेदना. त्या पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहतील आणि त्यांची गाणी सदैव लोकांच्या आयुष्यात गुंजत राहतील.

–पंतप्रधान नरेंद्र मोदी

आज प्रत्येक भारतीयासाठी आणि विशेषत: माझ्यासारख्या प्रत्येक संगीतप्रेमीसाठी अत्यंत दु:खाचा दिवस आहे, कारण आपली सर्वांची लाडकी Asha Bhosle आपल्यात राहिलेल्या



नाहीत।आशाताईंनी केवळ आपल्या मधुर आवाजाने आणि अद्वितीय प्रतिभेने वेगळी ओळख निर्माण केली नाही, तर आपल्या सुरांनी भारतीय संगीत अधिक समृद्ध केले। कोणत्याही प्रकारच्या संगीताशी जुळवून घेण्याची त्यांची विलक्षण क्षमता प्रत्येकाच्या मनाला भुरळ घालत असे। आपल्या आवाजाने कोट्यवधी हृदयांना स्पर्श करणाऱ्या आशाजींनी हिंदी, मराठी, बांग्ला, तमिळ, गुजराती अशा अनेक भाषांमध्ये तसेच लोकगीतांमध्येही आपली अमिट छाप सोडली।आशाताईंच्या आवाजात जितकी कोमलता होती, तितकीच त्यांच्या स्वभावात साधेपणा आणि आत्मीयता होती। त्यांची भेट झाली की संगीत आणि कलेसारख्या अनेक विषयांवर दीर्घ संवाद व्हायचा। आज त्या आपल्या सोबत नसल्या तरी त्यांच्या स्वरांमुळे त्या सदैव आपल्या हृदयात जिवंत राहतील।ईश्वर आशाजींना आपल्या श्रीचरणी स्थान देवो। त्यांच्या कुटुंबीयांप्रती आणि असंख्य चाहत्यांप्रती माझ्या मन:पूर्वक संवेदना। ॐ शांती शांती शांती

–अमित शहा

तीन वर्षांपूर्वी धडाक्यात नव्वदी साजरी करणार्या ज्येष्ठ गायिका, पद्मविभूषण, महाराष्ट्र भूषण आशाताई भोसले यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दु:खद आहे. त्यांच्या निधनाने मंगेशकर घराण्यातील



लतादिदींनंतर आणखी एक तारा निखळला आहे. सुरांची सुंदर बाग आज उजाड झाली. आशाताईंचा आवाज म्हणजे संगीताचा आत्मा होता. गायनातील बारमाही हिरवा ऋतू आणि भावभावनांचा सुरेल असा महासागर म्हणजे आशाताई. 'तोरा मन दर्पण कहलाए' अशा भावपूर्ण गाण्यापासून 'खल्लास'पर्यंत अनेक मूडची गाणी लीलया गाणार्या आशाताई भोसले यांनी भक्तिगीत, भावगीत, नाट्यसंगीत, गझल, शास्त्रीय संगीत, रवींद्र संगीत, लोकगीते, पॉप असे अनेक संगीत प्रकारांचे गायन करताना त्यावर आपला वेगळा ठसा उमटवला. मराठी, हिंदी, बांगलासह २० भारतीय भाषा आणि विदेशी भाषांमध्ये १२,००० वर गाणी त्यांनी गायली. 'महाराष्ट्र भूषण'सारखा 'बांगला विभूषण' पुरस्कारही त्यांना बहाल केला गेला. बदलांना सहजरित्या आत्मसात करणार्या अशा अष्टपैलू गायिका पुन्हा होणे नाही. अलिकडेच जागतिक रेडिओ दिनाच्या कार्यक्रमात आम्ही सोबत होतो, त्यांनी आग्रह करुन 'अभी ना जाओ छोडकर...' हे गाणे माझ्याकडून गाऊन घेतले होते आणि 'पहा मी मुख्यमंत्र्यांना गाणं गायला लावले', असे म्हणाल्याही होत्या. त्या आशाताईंचा सहवास आता आपल्याला लाभणार नाही, ही कल्पनाच करवत नाही. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांच्या आणि देशभरातील असंख्य चाहत्यांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. ॐ शांति

–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस





**मुंबई । प्रतिनिधी**

प्रसिद्ध पार्श्वगायिका आशा भोसले यांचे मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात निधन झाले. त्या ९२ वर्षांच्या होत्या. आशा भोसले यांना काल (शनिवार ११ एप्रिल २०२६) हृदयविकाराचा झटका आल्यामुळे ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आशा भोसलेंची नात झानई भोसले हिने इन्स्टा पोस्ट करून आजी ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार घेत असल्याचे सांगितले होते. आशा भोसले मागील सात दशकांपासून पार्श्वगायन करत होत्या. त्यांनी मराठी, हिंदीसह अनेक भाषांतील चित्रपटांसाठी पार्श्वगायन केले. चुनरिया या १९४८ मध्ये आलेल्या चित्रपटापासून आशा भोसले यांच्या पार्श्वगायनाच्या कारकिर्दीला सुरुवात झाली. त्यांनी वीसपेक्षा जास्त भाषांमध्ये १६ हजारांपेक्षा जास्त गाणी गायली. मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तमिळ, मल्याळम, इंग्रजी आणि रशियनसह एकूण २० भाषांमध्ये आशा भोसले यांनी पार्श्वगायन केले.चतुरस्त्र गायिका आशा भोसले यांचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ रोजी झाला. लता मंगेशकर त्यांची मोठी बहीण. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्या सुमधुर आवाजाने कोट्यवधी रसिकांना वेड लावले. आशा भोसलेंनी दोन हजारांपेक्षा जास्त चित्रपटांतून गाणी गायली. अनेक अल्बमसाठीही त्यांनी गाणी गायली. आशा भोसलेंना २००८ मध्ये पद्मविभूषण या पुरस्काराने गौरविण्यात आले. इतर अनेक पुरस्कारांनीही त्यांना गौरविण्यात आले होते.रोमँटिक, गझल, पॉप, आयटम साँग अशा सगळ्या प्रकारची गाणी त्यांनी गायली. आशा भोसलेंची आरडी बर्मन यांच्यासोबतची जोडी खूप गाजली. पिया तू अब तो आजा, दम मारो दम, चुरा लिया है तुमने ही त्यांची प्रसिद्ध गाणी आहेत.आशा भोसले यांनी अनेक फिल्मफेअर आणि राष्ट्रीय पुरस्कार जिंकले आहेत. त्यांना पद्मविभूषण आणि पद्मभूषण या दोन्ही पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते.आशा भोसले यांचे पुत्र आनंद भोसले यांनी सांगितल्यानुसार अशा भोसले यांच्या राहत्या घरी म्हणजेच लोअर परेल येथील कासा ग्रांडेमध्ये उद्या (सोमवार १३ एप्रिल) सकाळी ११ वाजल्यापासून लोक त्यांचे अंतिम दर्शन घेऊ शकतील आणि दुपारी ४ वाजता शिवाजी पार्कमध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.

गानसम्राज्ञी आशा भोसले यांच्या दु:खद निधनाने गेल्या चार पिढ्यांची मने संगीताच्या बहरात



चिंबचिंब करणारा, आणि मनामनांना एका चंदेरी दुनियेच्या सफरीचा आनंद देणारा दैवी आवाज शांत झाला आहे. आशाताईंचा स्वर कानावर पडला नाही, असा दिवस गेल्या अनेक दशकांत उजाडला नाही, आणि मावळलाही नाही. या स्वराने असंख्य क्षण फुलविले, आणि फुलवत शकुनाच्या मेंदीने रंगलेले जगण्याचे असंख्य क्षण हसविलेदेखील. आशाताई ऐहिकदृष्ट्या आपल्यात नाहीत ही जाणीव पचविणे अवघड आहे, पण त्या स्वरांची सोबत मात्र कायम राहणार आहे. कारण या स्वरांचा साज कालातीत आहे. अनेक वेळा आशाताईंनी भेटण्याचे भाग्य मला लाभले, ते अविस्मरणीय क्षण कायमस्वरूपी माझ्या मनात अजरामर राहतील.

– उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

ज्येष्ठ गायिका आशाताई भोसले यांच्या निधनाने संगीत क्षेत्रातील एका सुवर्णयुगाचा अंत झाला



असून सुरांची 'सम्राज्ञी' काळाच्या पडद्याआड गेली आहे. मी आशाताईंना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करते.आशाताई भोसले यांच्या आवाजात विलक्षण माधुर्य, विविधता आणि भावनांची अप्रतिम अभिव्यक्ती होती. हिंदी, मराठीसह विविध भारतीय भाषांमधील हजारो गाण्यांमधून त्यांनी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. 'पिया तू अब तो आजा', 'दम मारो दम', 'इन आंखों की मस्ती', 'चुरा लिया है तुमने' यांसारखी असंख्य गाणी आजही रसिकांच्या ओठांवर आहेत. त्यांच्या गायकीत आधुनिकतेसोबतच पारंपरिकतेचा सुंदर संगम दिसून येतो.आशाताई भोसले यांचा संगीत प्रवास म्हणजे कठोर परिश्रम, सातत्य आणि कलेप्रति असलेल्या निष्ठेचे प्रतीक आहे. त्यांनी अनेक पिढ्यांतील श्रोत्यांना आपल्या सुरांनी मंत्रमुग्ध केले. त्यांच्या जाण्याने भारतीय संगीतसृष्टीचे मोठे नुकसान झाले आहे.

–उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

# मराठवाडा विभागात शेकापक्ष विस्ताराची जबाबदारी आता भाई मोहन गुंड यांच्या खाद्यावर

## अनेक वर्षे चळवळीचा अनुभव प्रचंड जनसंपर्क असणारा आक्रमक चेहरा शेकापने दिला

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

भारतीय शेतकरी कामगार पक्षाचा मराठवाडा एकेकाळी बालेकिल्ला होता. मराठवाड्याने शेकापला दिग्गज नेते दिले यामध्ये उस्मानाबादचे विरोधी पक्ष नेते, खासदार स्वातंत्र्य सैनानी भाई उध्दवराव पाटील, माजी खासदार भाई ड. नरसिंगराव काटीकर, परभणीचे आमदार भाई अण्णासाहेब गव्हाणे, नांदेडचे माजी खासदार, आमदार भाई डॉ. केशवराव धोंडगे, अहमदपूरचे माजी मंत्री किसनराव देशमुख, परभणीचे माजी खासदार शेषराव देशमुख, तुळजापूरचे माजी आमदार मानिकराव खपले, परभणीचे भाई लक्ष्मणराव नाना गोळेगावकर, कळंबचे माजी आमदार कुंडलिकराव घोडके , निलंग्याचे माजी आमदार भाई श्रीपतराव साळुंके,औसाचे माजी आमदार भाई मल्लनाथ गुंडनाथआप्पा, कंधारचे माजी आमदार गुरुनाथ कोरडे, गंगाखेडचे माजी आमदार भाई ज्ञानोबा गायकवाड,बीडचे जनार्दन तुपे, परतुरचे भाई माजी बारकुले या नेत्त्यांसह शेकडोवर आक्रमक झुंजार कार्यकर्त्यांची स्थानिक पातळीवर काम करणारी शेकापची मोठी फळी मराठवाड्यामध्ये होती. अलीकडच्या काळात भांडवली, जातीय गलिच्छ राजकिय समीकरणात चळवळीपासुन तरूण दुरावत गेले, पक्षाचे मराठवाड्यात बोटावर मोजण्याइतकेच लोक पक्षात उरले आहेत. आशा परिस्थितीत प्रचंड जनसंपर्क असणारा आक्रमक आंदोलनातील चेहरा म्हणून ओळख असणारे शेकापचे राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य भाई मोहन गुंड यांच्यावर दौरे करुन बांधणीची जबाबदारी देण्यात आल्यामुळे मराठवाड्यामध्ये कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे.



मराठवाडा विभागातील पक्ष संघटन बांधणीसाठी पुर्ण वेळ काम करणारे भाई मोहन गुंड यांच्यावर जबाबदारी द्यावी अशी मागणी अनेक कार्यकर्त्यांची होती, त्या अनुषंगाने पक्षाचे सरचिटणीस मा. आमदार भाई जयंत पाटील यांच्या आदेशान्वये मराठवाडा विभागाची जबाबदारी भाई मोहन गुंड यांच्यावर सोपवण्यात आली असल्याची माहिती पक्षाचे कार्यालयीन चिटणीस भाई ड.राजेंद्र कोरडे यांनी या संदर्भातील पत्र भाई मोहन गुंड यांना दिले आहे. या पत्रानुसार मराठवाडा विभागात पक्षाचा दौरा आयोजित करून ग्राम, तालुका व जिल्हा स्तरावर पक्ष संघटन करणे अपेक्षित आहे, पक्ष विस्तारासाठी समित्यांची स्थापना करणे, पदाधिकाऱ्यांची निवड करणे तसेच आवश्यक त्या ठिकाणी जनसंघटना आघाड्याची स्थापना करून त्यावर पदाधिकारी नेमण्याचे अधिकार ही भाई मोहन गुंड यांना देण्यात आले आहेत. केलेल्या कामाचा सविस्तर अहवाल वेळोवेळी मध्यवर्ती कार्यालयात पाठवण्याच्या सूचना ही देण्यात आल्या आहेत. या निवडीमुळे मराठवाड्यात शेतकरी कामगारांच्या प्रश्नांवर शेकाप अधिक आक्रमकपणे काम करेल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे. भाई मोहन गुंड हे चिटणीस मंडळाचे सदस्य असून अत्यांत चिकाटीने जिद्दीने प्रमाणीकपणे काम करणारा चेहरा म्हणुन त्याची मराठवाड्यात ओळख आहे. अनेक शेतकरी कामगाराचे यशस्वी आंदोलने त्यांच्या नावावर आहेत, सक्रीय चळवळीतील अनुभवाचा फायदा पक्ष कार्यकर्त्यांना होईल असा विश्वास पक्ष नेतृत्वाने व्यक्त केला आहे. मराठवाडा विभागासह राज्यभरातून भाई मोहन गुंड यांचं अभिनंदन करण्यात येत आहे, मात्र पुन्हा शेतकरी कामगार पक्ष मराठवाड्यामध्ये उभा करणे हे त्यांच्या समोरील मोठं आव्हान असणार आहे हे मात्र नक्की.

> **" मे मध्ये मराठवाड्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची तातडीची बैठक आयोजित करण्यात येणार आहे, पूर्ण विभागामध्ये तालुका दौरे करून जुन्या नव्या कार्यकर्त्यांची सांगड घालून प्रत्येक तालुक्यामध्ये कमिटी स्थापन करून, शेतकरी कामगाराच्या प्रश्नावर शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता प्रत्येक तालुक्यात मराठवाड्यामध्ये शेकापचे कार्यकर्ते अग्रही भूमिका घेऊन प्रश्न सोडवण्यासाठी काम करतील या साठी मी स्वत: लक्ष घालणार आहे प्रत्येक गावात गावात शेकापचे विचार पोहचविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मत शेतकरी कामगार पक्षाचे राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य भाई मोहन गुंड यांनी व्यक्त केले आहेत**

# धामणगावात महिला अधिकाऱ्यांची रेती घाटावर धाडसी कारवाई

## २५० ब्रास रेतीसह पोकलँड, डिझेल टँकर जप्त



दैनिक वादळ वार्ता

**धामणगाव रेल्वे । प्रतिनिधी**

सलाबादपूर व सोनोरा काकडे येथील रेती घाटावर अवैध उत्खननाविरोधात प्रशासनाने धाडसी कारवाई केली. ९ एप्रिल २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी श्रद्धा उदावंत व जिल्हा खनिकर्म अधिकारी प्रणिता चापले यांनी संयुक्तरित्या छापा टाकत मोठा रेतीसाठा जप्त केला.

या कारवाईत विना नंबरचे पोकलँड, एमएच ४० सीडी ७९३५ क्रमांकाचा डिझेल टँकर तसेच सुमारे २५० ब्रास अवैध रेती साठा आढळून आला. संबंधित साहित्य जप्त करण्यात आले असून तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी पंचनामा केला.

जप्त केलेला रेतीसाठा तहसीलदार, धामणगाव रेल्वे यांच्या ताब्यात देण्यात आला असून अवैध रेती उत्खननाविरोधात प्रशासनाची ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे.

# सलग १८ तास अभ्यासातून महामानवांना अभिवादन

## तुलसी शैक्षणिक समूहाचा उपक्रम; तब्बल १२५४ वाचकांचा उत्स्फूर्त सहभाग

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधत तसेच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने शनिवारी तुलसी संकुलात 'सलग १८ तास अभ्यास' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सकाळी ६.०० ते रात्री १२.०० या कालावधीत पार पडलेल्या या उपक्रमाला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तब्बल १२५४ विद्यार्थी, युवक आणि नागरिकांनी एकाच वेळी शिस्तबद्ध अभ्यास करत महामानवांच्या विचारांना कृतिशील अभिवादन केले. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमा पूजनाने व अभिवादनाने झाली. यावेळी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे उपायुक्त मा.रवींद्र जोगदंड, तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष मा.प्रा.प्रदीप रोडे, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीडचे सहाय्यक उपायुक्त मा.उमेश सोनवणे, इतर मागास बहुजन कल्याण बीडचे सहाय्यक संचालक मा.डी.बी.क्षिरसागर, प्राचार्य मा.डॉ.कमलाकर



कांबळे, उपशिक्षणाधिरी मा.भगवान सोनवणे, मा. दीपा रोडे आदी मान्यवर उपस्थित होते. उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी विविध मार्गदर्शनपर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे यांनी 'वाचन संस्कृती विकसित करणे' या विषयावर मार्गदर्शन करत वाचनाचे मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. त्यानंतर प्रा. प्रदीप रोडे यांनी स्पर्धा परीक्षांचे स्वरूप तसेच दहावी व बारावीनंतर उपलब्ध करिअरच्या विविध संधींबाबत सखोल माहिती दिली. दुपारच्या सत्रात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे उपायुक्त मा. रवींद्र जोगदंड यांनी 'क्रांतिसूर्य ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अनुबंध' या विषयावर प्रभावी मार्गदर्शन करत त्यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता स्पष्ट केली. उपक्रमासाठी सहभागींसाठी सकाळी चहा व अल्पोपहार, तसेच दुपारी आणि रात्री भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. उपस्थित विद्यार्थ्यांसाठी आवश्यक पुस्तके महाविद्यालयातर्फे उपलब्ध करून देण्यात आली. उपक्रमाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाल्याने तुलसी आयटी कॉलेज येथे जागा अपुरी पडली. त्यामुळे अतिरिक्त विद्यार्थ्यांसाठी तुलसी इंग्लिश स्कूल येथे स्वतंत्र बसण्याची व्यवस्था करण्यात आली. याशिवाय ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था तसेच मुला-मुलींसाठी सुरक्षित आणि स्वतंत्र बसण्याची सोय करण्यात आली होती. सायंकाळी झालेल्या 'विद्यार्थी मनोगत' सत्रात विद्यार्थ्यांनी या १८ तासांच्या शिस्तबद्ध अनुभवाबद्दल समाधान व कृतज्ञता व्यक्त केली. रात्री ११: ११.३० वाजता प्रमाणपत्र वितरणाने या उपक्रमाची सांगता झाली. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. प्रियांका रोडे, प्राचार्य प्रा. डी. जी. निकाळजे, डॉ. अश्विनी बेद्रे, डॉ. विजयकुमार बांदल, उमा जगतकार, प्रा. प्रकाश ढोकणे, प्रा. डी. डी. राऊत, प्रा. शुभम जोगदंड, डॉ. सुनील जोंधळे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. योगिता लांडगे यांनी केले, तर आभार प्रा. किशोर वाघमारे यांनी मानले.

## युध्दाच्या नावाने भाव वाढ करून सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरले जातेय तेल,प्लास्टिक,स्टील स्टाईल फरशी,मोठ्या प्रमाणात कीमती वाढवल्या

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

आखाती देशात इराण अमेरिका यांचे युद्ध सुरू असल्याचा फायदा घेत युद्धाच्या नावाने अनेक वस्तूंच्या किमती वाढवत सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरण्याचे प्रकार खाजगी कंपनी व व्यापाऱ्यांकडून होताना दिसून येत आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरण्याचे प्रकार होत आहेत.

आखाती देश अमेरिका इराण यांच्यामध्ये युद्ध सुरू असल्याचा फायदा घेण्यात येत आहे. प्लास्टिक, गॅस, तेल, स्टाईल, स्टिल इत्यादी या प्रकारे अनेक वस्तूंच्या किमती अवाच्या सव्वा केलेले आहेत.नाईलाजास्तव नागरिकांना चढ्या भावाने या वस्तू खरेदी कराव्या लागत आहेत. परंतू याचा आणि युध्दाचा कसलेही प्रकाराचा संबंध नसताना काही जण लबाडीने नागरिकांना फसवण्याचे काम करत आहेत. या प्रकाराकडे शासनाने लक्ष देण्याची गरज आहे. यातून सर्वसामान्य नागरिकांची मोठ्या प्रमाणावर लूट केली जात आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिक परेशान झाले आहेत. आता युध्दाला आजपासून विराम दिल्याचे समजत आहे आता तरी या किमती पुन्हा आटोक्यात आणणे गरजेचे आहे.
शासन प्रशासन यांनी लक्ष देण्याची गरज

युध्दाच्या नावाने अनेकांनी भाव वाढ करून सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरले आहे. युध्दाचा आणि काही वस्तूंचा कुठल्याही प्रकारचे संबंध नसताना आखाती देशांतील युद्धामुळे वस्तूंचे भाव प्रचंड प्रमाणामध्ये वाढवून विकले जात असल्याचे प्रकार देगलूर शहरातही पडत आहे. या गंभीर बाबीकडे शासन प्रशासन यांनी लक्ष देऊन जे चढ्या भावाने विक्री करत आहेत आशयावर कारवाई करणे गरजेचे आहे.
अमेरिका इराण युध्द थांबले आता तरी किंमती कमी होणार का?
आखाती देश इराण अमेरिका यांच्यातील युद्धाचा फायदा घेत खाजगी कंपनी व विक्रेत्यांनी वस्तूंच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढवल्या होत्या यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक भुर्दंड सहन करावा लागला. आता युध्द थांबले आहे या सर्व वस्तूंचे किंमती कमी होणार का ? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

## लाडकी बहीण योजना बंद करण्याच्या सूचनेवरून नागोराव पाटील हरडफकर आक्रमक; सरकारला विचारला जाब

दैनिक वादळ वार्ता
**हदगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेबाबत उच्च न्यायालयाने केलेल्या काही टिप्पणीनंतर आता ग्रामीण भागातून संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. हरडफ येथील सोसायटीचे चेअरमन *नागोराव पाटील हरडफकर* यांनी याप्रकरणी आक्रमक पवित्रा घेत सरकार आणि प्रशासनाला परखड सवाल विचारले आहेत.



केवळ बहिणींच्या योजनेमुळेच कर्ज कसे?
उच्च न्यायालयाने ही योजना बंद करण्याबाबत किंवा त्यावरील खर्चाबाबत सूतोवाच केल्यानंतर नागोराव पाटील यांनी विचारले की, जर लाडक्या बहिणींमुळे महाराष्ट्रावर कर्जाचा डोंगर वाढत असेल, तर ते पुराव्यासह सिद्ध करून दाखवावे. केवळ महिलांच्या कल्याणासाठी राबवल्या जाणाऱ्या योजनेवरच बोट का ठेवले जात आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.आमदार-खासदारांचे मानधन बंद करा - पाटील यांची मागणी पाटील यांनी आपल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की, जर राज्याची आर्थिक स्थिती खरोखरच बिकट असेल, तर सर्वात आधी सरकारी कर्मचाऱ्यांचे *सातवे आणि आठवे वेतन आयोग* रद्द करण्यात यावेत. तसेच, *आमदार आणि खासदारांना मिळणारे भरमसाठ मानधन व इतर भत्ते* तात्काळ बंद करावेत.
त्यांनी आपल्या मागण्यांमध्ये वेतन कपात:उच्च न्यायालयाने आधी लोकप्रतिनिधी आणि बड्या अधिकाऱ्यांचे मानधन बंद करण्याचे आदेश द्यावेत. लाडकी बहीण योजना सुरूच राहावी:** गरिबांच्या घरात दोन पैसे देणारी योजना बंद करणे अन्यायकारक आहे.
आर्थिक समतोल:जर कर्ज झाले असेल, तर त्याची झळ केवळ सामान्य जनतेला आणि महिलांनाच का? मोठ्या पगाराच्या कर्मचाऱ्यांनी आणि लोकप्रतिनिधींनीही त्याग करावा.नागोराव पाटील हरडफकर यांच्या या भूमिकेमुळे आता स्थानिक पातळीवर आणि सोशल मीडियावर मोठ्या चर्चांना उधाण आले असून, त्यांनी थेट सरकारलाच या मुद्द्यावर घेरले आहे.

## सामाजिक समता सप्ताहात विवीध कार्यक्रमाची पर्वनी



दैनिक वादळ वार्ता
**भोकरदन । प्रतिनिधी**

दिनांक ०८एप्रिल ते१४ एप्रिल पर्यंत सहायक समाज कल्याण आयुक्त कार्यालय जालना च्या वतीने सदर सप्ताहात एकांकिका, भाषन, निबंध, प्रश्न मंजुषा, प्रबोधन ईत्यादी कार्यक्रम बार्टी व सामाजिक न्याय विभाग यांच्या मार्फत राबविण्यात येत आहेत.याचाच एक भाग म्हणुन दिनांक ११एप्रिल रोजी समतादुत सुधाकर वर्पे व कमर शेख यांनी अनु. जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवाशी शाळा भोकरदन येथे भाषण, निबंध स्पर्धा घेतली. सर्व प्रथम क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व महामानवांच्या प्रतीमेस पुष्पहार अपर्ण करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सोहळया बाबत उपस्तिथ राहण्याचे आव्हान करुन त्यांच्या जिवनचरित्रावर प्रबोधन करण्यात आले. व विजेत्यांना प्रमाण-पत्र व बार्टीचे सन्मान चिन्ह वाटप करण्यात आले यावेळी शाळेचे मुख्याध्यापक. मुख्याद्यापक श्री रघुनाथ खेडकर सर, सतिश गडवे सर,श्री. लुंगाडे सर , श्री. सुरडकर सर,श्रीमती साबळे मॅडम, श्रीमती तिळवणे मॅडम, सह सर्व कर्मचारी व विद्यार्थी उपस्तिथ होते. सदर सप्ताह सह्ययक समाज कल्याण आयुक्त राजू एडके, समाज कल्याण आधिकारी श्रीमती मोदाळे मॅडम, श्री सुनगत सर अंभोरे सर प्रकल्प आधिकारी भाग्यश्री पाईकराव यांच्या मार्गदर्शनाखाली
राबविण्यात आला

## पेटला वनवा क्रांतीचा चित्रपटाचा उद्धाघाटन सोहळा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**दिग्रस । प्रतिनिधी**

दिग्रस शहरात व तालुक्यात विशेष मराठी चित्रपट पेटला वनवा क्रांतीचा बुद्ध कबीर शिवराय फुले शाहू आंबेडकर विचारधारेवर आधारित परिवर्तनवादी सामाजिक क्रांतिकारी चित्रपट आपल्या दिग्रस येथील शंकर टॉकीज या चित्रपटग्राहट दिनांक १० एप्रिल पासून रोज ११, ४५ वाजता (फक्त एक शो) दाखविण्यात येत आहे, सदर उद्धाघाटन प्रसंगी यवतमाळ वाशिम मतदार संघाचे खासदार आदरणीय संजय भाऊ देशमुख व दिग्रस नगर परिषदेचे अध्यक्ष सौ पंचशीला वाल्मीक इंगोले यांच्या हस्ते उद्धाघाटन संपन्न झाले तसेच दिग्रस शहरातील सर्व पत्रकार आणि इतर प्रतिष्ठित मान्यवरांचे उपस्थितीत या चित्रपटाचा मोठ्या थाटात उद्धाघाटन करण्यात आले आहे, या चित्रपटाचे माध्यमातून आंबेडकर चळवळीला प्रोत्साहन देणे. व चळवळीच्या कार्यकर्त्यांना ऊर्जा पोहोचवणे हाच मुख्य उद्देश आहे. हा चित्रपट जास्तीत जास्त महिलांनी पहावे असे चित्रपटाचे डायरेक्टर निर्माता मुकुंद नितोणे यांनी मुलाखतीत सांगितलेआहे. या चित्रपटाच्या सरपंच तात्या यांचे भूमिकेत चित्रपटाचे निर्माते मुकुंद नितोणे यांची अत्यंत प्रभावशाली भूमिका पाहण्यास मिळणार आहे. करिता सर्व बहुजनांनी व सर्व नागरिकांनी हा चित्रपट पाहून सर्व कलाकारांना प्रोत्साहन द्यावं जेणेकरून आंबेडकर चळवळीला मोलाचा प्रोत्साहन मिळेल असे दिग्रस शहरातील आंबेडकर चवळीच्या कार्यकर्त्यांनी आव्हान केले आहे.




### आंबेडकर चळवळीचे एकमेव महाराष्ट्रात गाजलेले चित्रपट-चित्रपट निर्माता मुकुंद नितोणे प्रवीण तायडे

**कार्यकारी निर्माता. महेश भारंबे. सहनिर्माता.. डॉ. सतीश खडसे. हर्षा तायडे. सुनैना नितोणे.छायाकण.. शांताराम भोसले. विश्वास साठे. कला. अनिल फुंडकर. संकलन.. विश्वास साठे. कलाकार.. कुणाल शिरोळे. रूपाली जाधव. होनाजी चव्हाण. दिलीप केदार. भूमी डाली. विकास महाजन. पवन गावंड. उपजिल्हाधिकारी. संजय खडसे. उपजिल्हाधिकारी. राहुल तायडे. संगीता जामनिक.मा कृष्ण शिंदे. हरिहर नीमकडे. प्रशांत सायरै. सुनील कल्ले. मुकुंद नितोणे.. हे सर्व. पेटला वनवा क्रांतीचा. मराठी चित्रपटाचे कलाकार आहे.**

## महात्मा फुले यांच्या कार्याने समाजाला आधुनिक विचार दिला डॉ.गांधी बानायत

दैनिक वादळ वार्ता
**पाचोड। प्रतिनिधी**

पाचोड : येथील शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. गांधी बानायत उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे होते.कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. गांधी बानायत यांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, मुलींसाठीची पहिली शाळा तसेच अस्पृश्यांसाठीची पहिली शाळा सुरू करून फुले यांनी शिक्षणाचा प्रसार केला. तसेच सत्यशोधक समाजाची स्थापना करून त्यांनी समाजात विज्ञाननिष्ठ विचार रुजवले. 'गुलामगिरी' या ग्रंथाच्या माध्यमातून सर्वसामान्यांमध्ये जागृती निर्माण केली, तर 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथातून शेतकऱ्यांच्या समस्या समाजासमोर मांडल्या.



अध्यक्षीय समारोप करताना डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी महात्मा फुले यांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. त्यांनी नमूद केले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचा शोध महात्मा फुले यांनी लावला तसेच शिवाजी महाराजांवरील पहिला पोवाडा त्यांनी रचला. समाजातील अंधश्रद्धा, वाईट चालीरीती आणि परंपरांवर प्रहार करत फुले यांनी आपल्या लेखणीतून समाजसुधारणेचा मार्ग दाखवला आणि आधुनिक विचारांची दिशा दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनोद कांबळे यांनी केले, तर आभार डॉ. हेमंतकुमार जैन यांनी मानले यावेळी उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव, डॉ. सुरेश नलावडे, डॉ. विलास महाजन, डॉ. उत्तम जाधव, डॉ. सुभाष पोटभरे, दादासाहेब एखंडे, आप्पासाहेब नेमाने यांच्यासह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## वाय.सी.कॉलेज स्पर्धा परीक्षा केंद्राचा विद्यार्थी महावीर रानगट यांची एमपीएससीतून कर सहाय्यक पदावर निवड

दैनिक वादळ वार्ता
**सोलापूर । प्रतिनिधी**

एमपीएससी परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करत वाय. सी. कॉलेज स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थी महावीर रानगट यांची कर सहाय्यक पदावर निवड झाली आहे. राज्यात २९व्या क्रमांकाने उत्तीर्ण होत त्यांनी यश संपादन केले असून, त्यांच्या या कामगिरीमुळे महाविद्यालय व स्पर्धा परीक्षा केंद्राचा नावलौकिक अधिक उंचावला आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.महावीर रानगट यांच्या या यशाबद्दल कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे तसेच डी. जी. कॉलेजचे प्राचार्य डॉ. अरुण आंधळे उपस्थित होते.या प्रसंगी स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक डॉ. गणेश कोकाटे, समन्वयक प्रा. सुशील यादव, प्रा. डॉ. बिपिन शिंदे, ग्रंथपाल नितीन हांडे,



ऋषिकेश कराळे, किरण माने, शंभूराजे, राजेश गायकवाड तसेच केंद्रातील सहकारी उपस्थित होते. सर्वांनी महावीर रानगट यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.महावीर रानगट यांनी आपल्या यशाचे श्रेय स्पर्धा परीक्षा केंद्राचे मार्गदर्शन, नियमित अभ्यास व प्राध्यापकांचे सहकार्य यांना दिले. त्यांनी आपले संपूर्ण शिक्षण तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी 'कमवा व शिका' योजनेतून पूर्ण केली असल्याने त्यांचे यश अधिक प्रेरणादायी ठरले आहे.त्यांच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले असून, स्पर्धा परीक्षा क्षेत्रात नवचैतन्य निर्माण झाले आहे. महावीर रानगट यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील शासकीय सेवेसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# भाजपाच्या कार्यकर्त्यांनी जबाबदारी आणि कर्तव्य ओळखून समाजात वागले पाहिजे-प्रवक्ता राम कुलकर्णी

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

सध्याच्या राजकीय परिस्थितीत केंद्र आणि राज्यात भाजप सत्ता स्थानी आहे, याचा अर्थ सर्वसामान्य जनतेचा पक्षावर प्रचंड विश्वास वाढला आहे. हा विश्वास भाजपाच्या संस्कृती, विचारसरणी आणि शेवटच्या घटकापर्यंत काम करण्याच्या भूमिकेमुळे निर्माण झाला आहे, असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केले.

पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियानांतर्गत किटी आडगाव ता माजलगाव येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.अध्यक्षस्थानी पांडुरंग झोडगे होते भाजपा नेते प्राध्यापक देविदास राव नागरगोजे भाज्युमचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे मंडळाचे अध्यक्ष रूपालीताई कचरे , हानुमान कदम अँड.भाग्यश्री ढाकणे डॉ.अभिजीत सोळुंके आदी मान्यवरांची उपस्थिती होती .समारोपाच्या सत्रात संजय आंधळे यांनी कार्यविस्तार भाग्यश्री ढाकणे यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना तर देविदास नागरगोजे यांनी वैचारिक जडणघडण या विषयावर प्रकाश टाकला . बोलताना राम कुलकर्णी यांनी कार्यकर्ता आणि त्याची कार्यपद्धती या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

कुलकर्णी म्हणाले, निःस्वार्थपणे काम करणारा तोच खरा कार्यकर्ता असतो. पक्षाचा कार्यकर्ता हा निष्ठा, विचार आणि तत्वांनी प्रेरित असावा. भाजपात व्यक्तीस्वार्थासाठी नव्हे, तर देश आणि समाजहितासाठी काम केले जाते. सुसंस्कृतपणा, सेवाभाव, समर्पण आणि त्याग हीच कार्यकर्त्याची खरी ओळख आहे, असे त्यांनी नमूद केले.




कार्यकर्त्यांनी आपल्या आचरणातून समाजात आदर्श निर्माण करावा. केंद्र आणि राज्य सरकारच्या जनकल्याणकारी योजना जाणून घेऊन त्या तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारीही कार्यकर्त्यांची असल्याचे त्यांनी सांगितले. तोंडात साखर, डोक्यात बर्फ आणि पायात चक्र हे गुण अंगी बाळगल्यास कार्यकर्त्याचे नेतृत्व अधिक सक्षम होते, असेही ते म्हणाले.

पक्षात काम करताना अंतर्गत मतभेद आणि गटबाजी बाजूला ठेवून पक्ष, झेंडा आणि नेतृत्व याबद्दल निष्ठा ठेवणे आवश्यक आहे. संघटन मजबुतीसाठी कार्यकर्त्यांनी सातत्याने परिश्रम घ्यावेत, तसेच प्रत्येक ठिकाणी पक्षाची विचारधारा आणि तत्वे दिसली पाहिजेत, असे आवाहन त्यांनी केले.

भाजपा हा जगातील सर्वात मोठा पक्ष असून २५ कोटींपेक्षा अधिक सदस्यसंख्या आहे. त्यामुळे आपण पक्षात आहोत हीच आपली ताकद आहे, हे लक्षात घेऊन कार्यकर्त्यांनी कोणतीही अपेक्षा न ठेवता जनतेच्या सेवेसाठी रात्रंदिवस कार्यरत राहावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमास स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. वर्ग प्रमुख प्रदीप जाधव विष्णुपंत आगे शरद कचरे कल्याण शेफ सुधाकर रासवे सचिन तौर शरद पवार शरद पवार पवार यांच्यासह सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले .या वर्गाचे सूत्रसंचालन आनंद जगताप यांनी केले .

# ग्राम रोजगार सेवकांचे बेमुदत धरणे आंदोलन

दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । प्रतिनिधी**




विविध प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी जिल्हा परिषद नांदेड येथे नायगाव व उमरी तालुक्यातील ग्राम रोजगार सेवकांनी बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे.शासनाने ग्राम रोजगार सेवकांच्या मागण्यांकडे तात्काळ लक्ष देऊन न्याय द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

आंदोलकांच्या प्रमुख मागण्यांमध्ये दि. ३ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करून ग्राम रोजगार सेवकांना फिक्स मानधन देण्यात यावे, तसेच दि. २ मे २०११ चा शासन निर्णय रद्द करून पूर्णवेळ कर्मचारी म्हणून शासन निर्णय काढण्यात यावा, यांचा समावेश आहे.

याशिवाय रोजगार सेवकांकडून जॉब कार्ड ई-केवायसी करण्यासाठी प्रत्येक जॉब कार्डमागे २० रुपये मानधन देण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली आहे. नायगाव तालुक्यातील ग्राम रोजगार सेवकांचे मार्च २०२५ चे मानधन गटविकास अधिकारी यांच्या खात्यात जमा असूनही ते संबंधित रोजगार सेवकांना देण्यात आलेले नाही. याबाबत चौकशी करून संबंधितांवर उच्चस्तरीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

तसेच उमरी तालुक्यातील मौजे चिंचाळा व बेलदार येथील ग्राम रोजगार सेवकांची सुनावणी दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आली होती. मात्र अद्यापपर्यंत या प्रकरणाची चौकशी पूर्ण झालेली नसल्याने संबंधितांना न्याय मिळालेला नाही. त्यामुळे या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून न्याय द्यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

वरील सर्व मागण्या मान्य होईपर्यंत बेमुदत धरणे आंदोलन सुरूच राहणार असल्याचा इशारा ग्राम रोजगार सेवकांनी दिला आहे. या आंदोलनामुळे जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेच्या कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्रशासनाने या मागण्यांवर तातडीने निर्णय घेऊन आंदोलन मागे घेण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा जिल्हा सचिव प्रकाश बैलकवाड व्यक्त केली आहे.

# समर्थ रायगड जनरल कामगार संघटनेमुळे कामगारांना पगार वाढ

## करारानुसार कामगारांना मिळणार विविध सेवा सवलती.

दैनिक वादळ वार्ता
**उरण । प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील भेंडखळ येथे पोलीरीस कंपनीत समर्थ रायगड जनरल कामगार संघटने अंतर्गत कार्यरत असणारे इलेक्ट्रिशन व मेंटेनन्सचे काम करणारे कर्मचारी कार्यरत असून या कंपनीत समर्थ रायगड जनरल कामगार संघटना व जीएमसी मेंटेनन्स वर्क एल एल पी यांच्यात वेतन वाढीचा यशस्वी संपन्न झाला. या करारा अंतर्गत कामगारांना तीन वर्षासाठी प्रति महिना प्रति व्यक्ती ६२५० रुपये इतकी वेतन वाढ करण्यात आली आहे. तसेच पगारवाढी सोबत बोनस व इतर सेवा सुविधा जसे की रजा, सुरक्षा साहित्य, युनियनची देणी, थकबाकी आदी सुविधा कामगारांना मिळणार आहेत. या करारा प्रसंगी समर्थ रायगड जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अतुल भगत, युनियन लीडर नैनेश म्हात्रे, किशोर बनसोडे, जीएमसीचे मालक इरफान पटेल, ऍडमिन ऑफिसर अरुण माने, चिटणीस अजय पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. या करारामुळे कामगार वर्गामध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून कामगारांनी समर्थ रायगड जनरल कामगार संघटनेचे तसेच जीएमसी मालक इरफान पटेल,पोलीरिस कंपनी प्रशासनाचे आभार मानले आहेत. समर्थ रायगड जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून हे यशस्वी करार संपन्न झाल्याने संघटनेच्या कार्याचेही सर्वत्र कौतुक होत आहे. कामगारांच्या न्याय हक्कासाठी कामगारांना त्यांचे हक्क व अधिकार मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्नशील असलेल्या समर्थ रायगड जनरल कामगार संघटनेची यशस्वी घोडदौड मोठ्या प्रमाणात सुरू असून कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात संघटनेकडे आकर्षित होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



# दुष्काळात दिलासा! भालगावचे माजी सरपंच अंकुश मामा कासुळे यांची विहीर गावकऱ्यांसाठी खुली



दैनिक वादळ वार्ता
**पाथर्डी । प्रतिनिधी**

पाथर्डी तालुक्यातील भालगाव येथे भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून पाणीटंचाईमुळे ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा कठीण परिस्थितीत गावातील माजी सरपंच अंकुश मामा कासुळे यांनी सामाजिक बांधिलकी जपत आपली खाजगी विहीर गावकऱ्यांसाठी खुली करून दिली आहे.

गावात पिण्याच्या पाण्याची तीव्र कमतरता भासत असताना कासुळे यांनी पुढाकार घेत विहिरीतील पाणी सर्वांसाठी उपलब्ध करून दिले. त्यांच्या या उपक्रमामुळे अनेक कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला असून भालगाव चे सरपंच पोपट रोकडे , बंटी खेडकर व ग्रामस्थांकडून त्यांचे विशेष कौतुक होत आहे.


सध्या परिसरात पावसाअभावी शेतीसह जनजीवन विस्कळीत झाले आहे. अशा वेळी कासुळे यांसारख्या व्यक्तींनी पुढे येत समाजासाठी केलेली मदत ही इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

गावकऱ्यांनी प्रशासनाकडेही पाणीटंचाईच्या समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली असून दीर्घकालीन उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली आहे.

# सूर्यचंद्र इंडेन गॅस एजन्सी भादा बंद असल्याने संतप्त झाले ग्राहक

दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

औसा:तालुक्यातील भादा येथील सूर्यचंद्र इंडेन ग्रामीण गॅस वितरक भादा ता औसा हे शुक्रवार दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी सकाळी नऊ वाजता उघडण्या ऐवजी एजन्सी उघडण्यातच आली नाही.दुकान बंद होते. यामुळे सकाळी सात पासून उभा टाकलेली ग्राहक हे वाट पाहून सदरील एजन्सीवर संतप्त झाले आणि संतप्त झालेल्या या ग्राहकांनी भादा गावचे उपसरपंच बी एम शिंदे तसेच भादा पोलीस ठाणे मधील बीट जमादार भगवंत शिरसागर यांना बोलावून घेतले तोपर्यंत बारा वाजून गेले होते आणि त्यांचा गॅस एजन्सी चे चालक आणि मालक चंद्रकांत एस कुंजीर यांच्याशी संपर्क झाल्याने त्यांनी एजन्सीकडे बाराच्या नंतर मुलाला पाठवून देण्यात आले. तोपर्यंत सकाळपासून थांबलेले ग्राहक हे भेटा,बोरगाव , कवठा,




आंदोरा, उटी आधी भागातून आले होते ते ग्राहक संतप्त होऊन एजन्सीवर कार्यवाही झाली पाहिजे ,वेळेवर गॅस देत नाहीत, पैसे जास्त घे, घरपोच सेवा मिळत नाही? आणि तहसीलदार औसा यांना लवकरच निवेदन देऊन या एजन्सी बाबत तक्रार केली जाईल अशाही प्रतिक्रिया या ठिकाणी उपलब्ध असलेल्या नागरिकांनी दिल्या .यानंतर पोलीस आणि भादा गावचे स्थानिक पुढारी यांच्या मध्यस्थीने या ठिकाणी होत असलेली ग्राहकांची संतप्त प्रतिक्रिया थोपवून हजर असलेल्या सर्व ग्राहकांना गॅस उपलब्ध करून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला आणि गॅस एजन्सी धारकास वेळेवर गॅस उपलब्ध करून वेळेचे बंधन पाळून गॅस एजन्सी दैनंदिन नागरिका करिता दुकान उघडे ठेवून नागरिकांना सहकार्य करावे असे त्यांनी एजन्सी धारकास सुचविले.यानंतर या ठिकाणी असलेली गर्दी हळूहळू कमी झाली आणि उपस्थित असलेल्या सर्व ग्राहकांना नियमानुसार डीएसी नंबर आल्यानंतर गॅस उपलब्ध करून देण्यात आला यानंतर झालेली गर्दी कमी झाली.

# म.फुले जन्मोत्सव जयभीम नगर मध्ये उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांचे जन्मोत्सवानिमित्त जय भीम नगर माजलगाव येथील फुले आंबेडकर जन्मोत्सव समितीच्या वतीने मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जन्मोत्सवाच्या सुरुवातीला महात्मा ज्योतिबा फुले यांना बाबासाहेब आंबेडकरांनी गुरु का मानले या विषयावर सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील प्राध्यापक संजय बागुल यांचे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक जय भीम नगर माजलगाव सायंकाळी सात वाजता आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानाचा विषय होता महात्मा ज्योतिबा फुले यांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी गुरु का मानले

आपल्या अभ्यासपूर्ण व्याख्यानात बोलताना प्राध्यापक संजय बागुल म्हणाले की बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिक मुक्कामी १९५१ साली सांगितले की माझे पहिले गुरु तथागत भगवान गौतम बुद्ध आहेत दुसरे गुरु संत कबीर आहेत व तिसरे गुरु महात्मा ज्योतिबा फुले हे आहेत हे तिन्ही महापुरुष यांची व बाबासाहेब आंबेडकरांची प्रत्यक्ष जीवनात कधीही भेट झालेली नव्हती व ते वेगवेगळ्या जातींचे होते परंतु त्यांचे विचार वाचनात येऊन त्यांच्या विचार बाबासाहेबांच्या विचाराची मिळाल्याने बाबासाहेबांनी त्यांना गुरु मानले. बाबासाहेब आंबेडकरांच्या तिन्ही गुरु पैकी पहिले गुरु सिद्धार्थ गौतम बुद्ध यांनी रोहिणी नदीच्या पाण्यासाठी दोन राज्यांमध्ये युद्ध न करता ग्रह त्याग केला तर दुसरे गुरु महात्मा ज्योतिबा फुले यांनी अस्पृश्यांना पाण्यासाठी आपला स्वतःच्या मालकीचा हौद रिकामे केला या आपल्या गुरूंचा आदर्श घेऊनच बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह पाण्यासाठी केला

महात्मा फुले हे गरीब नव्हते फार श्रीमंत होते परंतु ते माळी या शूद्र जाती जन्माला आलेले असल्याने त्यांच्या मित्राच्या लग्नातून महात्मा फुलेंना हाकलून देण्यात आले होते त्याचा विचार करून मंथन करून महात्मा फुलेंनी या जाती कोणी व कशा निर्माण




केल्या याचा शोध लावला व त्यांच्या लक्षात आले की जाती या निर्मिकाने निर्माण केलेल्या नसून माणसानेच त्याच्या स्वार्थासाठी जाती निर्माण केलेले आहेत म्हणून त्यांनी सर्व मानव महिला व पुरुष हे समान असले पाहिजेत ही शिकवण दिली. तसेच मनुस्मृतीनुसार महिलांना पतीच्या निधनानंतर सती जावे लागत असे त्यांचे केस ओपन केल्या जात असे व त्यांना विविध प्रकारचे बंधने टाकण्यात आलेले आहेत असेच एक ब्राह्मण समाजातील विधवा महिला काशीबाई या विधवेला नवरा वारल्याच्यानंतर गर्भवती राहिल्याने आत्महत्या करण्याचा प्रसंग आला होता महात्मा फुलेंनी त्या काशीबाई नावाच्या ब्राह्मण महिलेला आपल्याकडे आणले व तुझा एक भाऊ म्हणून तुझ्या मुलाचे पालन पोषण करीन असे सांगून विधवा महिलांना गर्भवती राहिल्यानंतर प्रसूती करून घेण्यासाठी बालहत्या प्रतिबंधक ग्रह काढले.

महात्मा फुलेंचे शिष्य म्हणून बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानामध्ये महिलांसाठी हिंदू कोड बिल निर्माण करून महिलांना हक्क अधिकार मिळवून दिले.

महात्मा ज्योतिबा फुले यांनी तत्कालीन इंग्रजांचे राजपुत्र पुण्यात आले असताना त्यांना भेटण्यासाठी महात्मा फुले शेतकऱ्यांच्या पेहरावात कार्यक्रमाला जाऊन शेतकऱ्यांच्या व्यथा इंग्रज दरबारी मांडल्या अशी ते शेतकऱ्यांची नेते होते म्हणून त्यांनी शेतकऱ्यांचा आसूड हा ग्रंथ सुद्धा लिहिला होता व त्यांचे शिष्य बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकऱ्यांसाठी १९५४ साली फार मोठा मोर्चा काढून त्यांच्या समस्याना वाचा फोडण्याचे काम केले होते तसेच कोकणातील शेतकऱ्यांसाठी खोती पद्धती बंद करण्यासाठी ही मोर्चे काढले होते परंतु आज काल शेतकऱ्यांच्या नावाने अनेक नेते मंडळी काम करतात व स्वार्थ साधून घेतात परंतु खरे शेतकऱ्यांचे नेते हे महात्मा ज्योतिबा फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हेच होते असेही प्रा. बागुल यांनी सांगितले याप्रसंगी अविनाश बनसोडे, रूपचंद कांबळे, चंद्रमणी डोंगरे, विजय पोळ, नगरसेवक सदानंद भैया प्रधान नगरसेवक रफिक भैया दीपक टाकणखार पत्रकार किशन भदर्गे पत्रकार प्रा. सुदर्शन स्वामी, शिक्षक नेते राजकुमार सोनवणे सर,राजेश पोटभरे अशोक डोंगरे लक्ष्मण पोटभरे सर अशोक मगर दिनेश निसर्गंध, अतुल भैय्या भदर्गे विनय पोटभरे राजू कांबळे यांच्यासह जय भीम नगर फुले आंबेडकर जयंती महोत्सव समिती व सर्व समाज बांधव उपस्थित होते.

# साने गुरुजी निवासी विद्यालय ही ऊसतोड शाळा राज्यातील पहिल्या दोन ते तीन क्रमांकाची शाळा आहे-लक्ष्मण बारगजे

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित साने गुरुजी निवासी प्रा.मा. उच्च माध्यमिक विद्यालय केज व मा.श्री नरेंद्रजी मोदी परिचारिका प्रशिक्षण संस्था केज यांच्या वतीने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय बीडचे निरिक्षक श्री.लक्ष्मण बारगजे यांनी सांगितले की,आमच्या विभागाच्या राज्यात ९५३ शाळा असून मी जिल्ह्यात व राज्यातील शाळा तपासणी करिता सर्व शाळांना भेटत असतो राज्यातील इतर शाळा पाहताना मला प्रकर्षाने जाणवले की,ही ऊसतोड शाळाराज्यातील पहिल्या दोन ते तीन क्रमांकाची शाळा म्हणून नावलौकिक प्राप्त करत आहे.विद्यार्थ्यांनो तुम्ही फार नशीबवान आहेत तुमच्या आई वडीलांनी तुमच्यासाठी ही शाळा निवडली आहे.तुमचे आई वडील ऊसाच्या फडात रक्ताचे पाणी करून फार कष्टाने तुम्हाला येथे शिकायला ठेवले आहे याची तुम्ही जाण ठेवली पाहिजे या शाळेने विविध क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धेत जिल्हास्तरीय, विभागस्तरीय,राज्य स्तरीय व राष्ट्रीय स्तरावर किती तरी पारितोषिक मिळवून आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे असे गौरवोद्गार काढून शाळेच्या प्रगतीचे कौतुक केले कार्यक्रमाचे अध्यक्ष अँड.उद्धवराव कराड साहेब यांनी सांगितले की,आमची शाळा ही संस्कारक्षम विद्यार्थी घडविण्याचे कार्य करत आहे.मला याची जाणीव आहे आम्ही यांच्यासाठी काम करतो हे ब्रीद वाक्य घेऊन आमचे सर्व कर्मचारी बंधू,भगिनी शाळेसाठी अहोरात्र मेहनत घेऊन विद्यार्थी



घडविण्याचे काम करत आहेत आम्ही कोणत्या घटकांसाठी कार्य करत आहे याची आम्हाला जाणीव आहे.आम्ही जरी परिपूर्ण नसलो तरी पण आमच्या काही उणीवा आहेत याची आम्हाला कल्पना आहे.आम्ही चांगल्यात चांगल्या पद्धतीचे दर्जेदार पद्धतीचे शिक्षण देण्याचे काम करत आहोत आमच्या ऊसतोड शाळेची प्रवेश प्रक्रिया ही एक मे रोजीच पुर्ण होते असे मार्गदर्शन केले आहे.या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध वेशभुषा परिधान करून आदिवासी गीत,बंजारा गीत,शेतकरी गीत, राजस्थानी गीत,कोळी गीत,कामेडी गीत,बाल गीत,मल्हारी गीत, रिमिक्स गाण्यावर मनसोक्त आनंद लुटला, विज्ञान नाटिका सादर करुन उपस्थितांची मने जिंकली या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाल पंचक्रोशीतील मोठ्या प्रमाणात पालकांनी सहभाग घेतला शाळेने बाहेर गावाहून आलेल्या माता पालकांची निवासी राहण्याची सोय केल्यामुळे पालकांनी आनंद व्यक्त केला.या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष श्री.राजेश कापसे,अरुण चाटे सरपंच तांबवा, गोपाळ वेताळ सरपंच घागरवडा,दिपक काळे सरपंच जिवाचीवाडी, महादेव चोले,ज्ञानोबा मैंद,आसाराम मैंद आदी मान्यवर उपस्थित होते अहवाल वाचन श्रीमती सुवर्णा सिरसट यांनी केले संचलन श्रीमती श्रुती लहाने,श्री.गुजर यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संकुलाच्या प्राचार्या डॉ.कविता कराड मॅडम यांनी केले.

# माळेगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात साजरी

## शासकीय सेवांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

शासकीय योजना आणि महसूल विभागाच्या सेवा थेट जनतेच्या दारात पोहोचविण्याच्या उद्देशाने देगलूर तालुक्यातील माळेगाव येथे १२ एप्रिल रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. या शिबिराच्या माध्यमातून परिसरातील शेकडो नागरिकांना विविध दाखले आणि शासकीय सेवांचा लाभ एकाच छताखाली मिळाल्याने सर्वसामान्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

**यावेळी महत्त्वाच्या व्यक्तींची उपस्थिती होती**

या शिबिराचे उद्घाटन आणि मार्गदर्शन आमदार जितेशभाऊ अंतापूरकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी अनुप पाटील, देगलूरचे गटविकास अधिकारी



श्रीकांत बळदे, नायब तहसीलदार गिरीश सर्कलवाड, गणेश राहेवार यांच्यासह विविध विभागांचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि माळेगाव परिसरातील सर्व गावांचे सरपंच, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रशासकीय सेवांचा 'ऑन द स्पॉट' निपटारा करण्यात आले या शिबिरामध्ये महसूल विभाग, कृषी विभाग, पंचायत समिती आणि इतर संबंधित विभागांचे स्टॉल्स लावण्यात आले होते. नागरिकांना लागणारे विविध प्रकारचे दाखले, फेरफार नोंदी, रेशन कार्ड दुरुस्ती, आणि विविध कल्याणकारी योजनांची माहिती व लाभ तात्काळ उपलब्ध करून देण्यात आले. क्लिष्ट प्रक्रियेला फाटा देत सुलभरीत्या सेवा मिळाल्याने नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# वडजाई देवी यात्रेनिमित्त डोईफोडवाडी (ता.बीड) येथे कुस्त्यांची रंगतदार दंगल

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

डोईफोडवाडी (ता. बीड) येथे वडजाई देवीच्या यात्रेनिमित्त पारंपरिक कुस्त्यांची भव्य दंगल मोठ्या उत्साहात पार पडली. यात्रेच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या कुस्ती स्पर्धेला परिसरातील ग्रामस्थ, तरुण मंडळी व कुस्तीप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.



या दंगल सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे विजेत्या मल्लाला देण्यात येणारी चांदीची गदा होय. जिल्हा परिषद सदस्य श्री राणा डोईफोडे यांच्या हस्ते ही चांदीची गदा प्रदान करून कुस्त्यांना प्रारंभ करण्यात आला. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.कुस्त्यांच्या मैदानात विविध गावांतील नामांकित मल्लांनी आपली ताकद आणि कौशल्य दाखवत प्रेक्षकांची मनं जिंकली. प्रत्येक कुस्तीला प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करून दाद दिली. काही लढती अत्यंत चुरशीच्या ठरल्या असून, शेवटपर्यंत निकाल लागेपर्यंत उत्सुकता शिगेला पोहोचली होती. या कार्यक्रमात गावातील मान्यवर तसेच सर्व गावकरी मंडळी आणि तरुणांनी उत्साहाने सहभाग घेतला. यात्रेचे वातावरण भक्तीमयआणि उत्साहपूर्ण होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामस्थ, युवक मंडळ व आयोजकांचे विशेष कौतुक करण्यात आले. अशा पारंपरिक उपक्रमांमुळे ग्रामीण भागातील क्रीडा संस्कृतीला चालना मिळत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# केज येथे'क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांना अभिवादन,विविध मान्यवरांची उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील ज्येष्ठ समाजसुधारक,थोर विचारवंत आणि स्त्री -शिक्षणाचे अग्रदूत 'क्रांतीसूर्य' महात्मा ज्योतिराव फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त केज शहरात उत्साहात अभिवादन करण्यात आलेयेथील महात्मा ज्योतिबा फुले चौक परिसरात आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून महापुरुषाच्या विचारांना उजाळा दिला. महापुरुषाच्या कार्याचे स्मरण स्त्री-शिक्षण,दलितोद्धार, अस्पृश्यता निवारण आणि सामाजिक समतेसाठी आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र



अभिवादन करण्यात आले.यावेळी उपस्थित मान्यवरांनी महात्मा फुले यांच्या क्रांतीकारी विचारा शिवाय आधुनिक समाजाची निर्मिती शक्य नव्हती,अशा भावना व्यक्त केल्या. मान्यवरांची उपस्थिती या अभिवादन कार्यक्रमा प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून खालील मान्यवर उपस्थित होते. डॉ.वासुदेव नेहरकर (उपसभापती,कृषी उत्पन्न बाजार समिती) चिंतामणी सत्वधर, प्रकाश मुंडे,विनोद शिंदे पाटील,उपेंद्र (भैया) शिंदे,मोहनराव सत्वधर, यासोबतच चिंचोलकर वकिल साहेब,मोरे सर, गणेश भोसले भैया, महादेव जाधवर यांच्या सह अनेक सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.महात्मा फुले यांनी मांडलेला समतेचा विचार आणि शिक्षणाची गंगा तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी केलेले कार्य हे येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी दीपस्तंभ ठरेल,असे मत यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती डॉ.वासुदेव नेहरकर यांनी व्यक्त केले.चौक परिसरात झालेल्या या कार्यक्रमाने संपूर्ण वातावरण महात्मा फुले यांचा विजय असो'च्या घोषणांनी भारावून गेले होते.सर्वांनी एकमुखाने महात्मा फुले यांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प केला.

# श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये शनिवारी सकाळ१०:०० वाजता क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील ग्रामीण भागातील नामांकित श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये शनिवारी सकाळी १० वाजता स्त्री शिक्षणाचे शिल्पकार महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी सर्वप्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. व महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जीवन चरीत्रावर सर्व उपस्थित मान्यवरांनी गौरोद्गागार काढले. यावेळी मा. सरपंच सुनील बापु देशमुख, श्री संस्कार इंग्लिश स्कूल चे अध्यक्ष अनिल गलांडे, ग्रामपंचायत सदस्य बालाजी राऊत, रामभाऊ गलांडे, दत्तात्रय कांबळे, शाळेच्या प्रिन्सीपल सिमा फुटाणे शिक्षीका कोमल कापरे, आरती आचार्य, रेश्मा गायकवाड, प्रियंका शिंदे, वैष्णवी काळे, प्रीती गाते, मनिषा कापरे, अर्चना सपाटे यांच्या सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्तीसगड जुनिअर चॅम्पियनशिप सुमितकुमारची सुवर्ण कामगिरी

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

छत्तीसगड येथे ता. ११ एप्रिल रोजी नुकत्याच राष्ट्रीय जुनिअर चॅम्पियनशिप कुस्ती स्पर्धा पार पडल्या. सदरील राष्ट्रीय जुनिअर चॅम्पियनशिप स्पर्धेत ७० किलो वजन गटात शहरालागत असणाऱ्या पुनर्वसित शेलापुरी येथील अष्टपैलू पैलवान सुमितकुमार अप्पासाहेब भारस्कर याने शेवटच्या अंतिम सामन्यात दमदार खेळी करत हरियाणा येथील मल्लास पराभूत करून सुवर्णपदकावर आपल नाव कोरत सुवर्ण कामगिरी केली. सदरील स्पर्धेसाठी कोच नरेंद्र कुमार, समीर देसाई, अनिरुधसर, कांबळे सर यांनी मार्गदर्शण केले.अतिशय संघर्षातून कुठलीही आखीव रेखीव पार्शवभूमी नसताना पैलवान सुमितकुमार भारस्कर याने आपल्या जिद्दीच्या जोरवार प्रचंड मेहनतीने विविध स्पर्धेत अनेक सुवर्ण पदकांची कमाई केली असून, सध्या सुमितकुमार हा रुस्तुम ए हिंद पै अमोल बचूडे कुस्ती संकुल येथे कुस्तीचे प्रशिक्षण घेत असून, तो सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव येथे महाविद्यालयीन शिक्षण घेत आहे. तसेच लवकरच तो आपल्या देशासाठी इंटरनॅशनल खेळणार असून,आंतरराष्ट्रीय



स्पर्धेत महाराष्ट्र राज्याला प्रतिनिधित्व मिळणार असल्याने या सुवर्ण कामगिरी बद्दल पैलवान सुमिकुमारचे सामाजिक, राजकीय तसेच विविध समाज माध्यमातून त्याच्यावर शुभेच्छा चा वर्षाव होत असून, सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

# साबला येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी, मान्यवरांचा केला विशेष गौरव

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

साबला येथील ग्राम पंचायत कार्यालय आणि समस्त गावकऱ्यांच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि चैतन्यपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या भव्य सत्कार समारंभात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा विशेष गौरव करण्यात आला. हा सोहळा शनिवार,दि. ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९-०० वाजता साबला येथील श्रीराम भक्त हनुमान मंदिर परिसरात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवाती ला महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी उपस्थितांनी महात्मा फुलेंच्या सामाजिक कार्याचा आणि विचारांचा जागर केला. या विशेष गौरव सोहळ्यात समाजातील विविध स्तरावर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या खालील मान्यवरांचा सत्कार



करण्यात आला.

डॉ.दिनकर रावसाहेब राऊत,प्रा.विष्णू रानबा सरवदे,कु.ऋतुजा अशोक नाईकनवरे,चि. अविनाश गुलाब काकडे, श्रीमती वैशाली विजय सरवदे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ.जनाबाई नरहरी काकडे व प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.शांतिनाथ बनसोडे सर परीक्षा नियंत्रक नांदेड विद्यापीठ व माजी सभापती श्री. विष्णुभाऊ घुले उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदर्श शिक्षक श्री.सुधीर नाईकनवरे सर यांनी केले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामायणाचार्य लक्ष्मण काकडे यांनी आपल्या मधुर वाणीतून केले. तसेच कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आदर्श शिक्षक श्री.नरहरी काकडे सर यांनी केले या कार्यक्रमासाठी गावातील आजी माजी सरपंच ग्रामपंचायत सदस्य व सर्व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामपंचायत कार्यालय, साबला यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला साबला नगरीतील नागरिक, महिला व तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.महात्मा फुलेंचे विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोंचवणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, अशी भावना आयोजकांनी यावेळी व्यक्त केली.या कार्यक्रमासाठी उपस्थित उपसरपंच कचराबाई सरवदे,ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ, पोपट काकडे,अशोक काकडे,तसेच काशिनाथ नाईकनवरे,अभिमान नाईकनवरे,श्रीमंत नाईकनवरे,हनुमंत नाईकनवरे,गणेश कटारे, गुलाब मुळे,विश्वनाथ नाईकनवरे,महादेव कटारे,अशोक नाईकनवरे व समस्त गावकऱ्यांच्या सहकार्याने आणि उत्साहाने हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077